# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

विषय:- वाहने निर्लेखीत करण्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्याबाबत व तसेच
वाहने निर्लेखन समिती गठीत करणेबाबत

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, शीव येथील २ निर्लेखित करण्यात येणारी वाहने जशी आहेत . तशा अवस्थेत लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे. सदर वाहनांची माहिती खालील प्रमाणे आहे.

निर्लेखित करण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशील :

| अ. क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी दिनांक | लिलावाचा दिनांक व वेळ | वाहने पाहण्याचे व लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-01BY-2558 | SKODA OCTAVIA | 17/3/2015 (10 yrs) | १६/०३/२०२६ सकाळी ११.०० वा. | कल्पतरू पॉईट, ४ था मजला, शीव माटुंगा स्किम नं ८, शीव (पूर्व),मुंबई-४०० ०२२. |
| 2 | MH-43-AF-8773 | TATA INDIGO | 27/4/2011 (14 yrs) | | |

## अटी व शर्ती

१) बोलीदाराने अनामत रक्कम रु.५,०००/- रोखीने कल्पतरू पॉईट, ४ था मजला, शीव माटुंगा स्किम नं ८,शीव(पूर्व),मुंबई-४०० ०२२ येथे लिलावाच्या वेळी जमा करावी.

२) दि ०६/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत वर नमुद केलेल्या ठिकाणी वाहने पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

३) दि १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत बोलीदाराने कल्पतरू पॉईट, ४ था मजला, शीव माटुंगा स्किम नं ८,शीव(पूर्व),मुंबई-४०० ०२२ येथे लिलाव करण्याकरीता हजर रहावे.

४) उच्चतम बोलीदाराने लिलावाची रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) महाराष्ट्र प्रदूषण नियत्रण मंडळाच्या नावे जमा करावी.

५) सदर धनाकर्ष जमा झाल्यानंतर बोलीदारास वाहनांचा ताबा व गेटपास देण्यात येईल.

६) सदर वाहन विक्री करण्याचे अंतिम अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहेत. ( प्रक्रिया थांबवणे व पुढे ढकलणे किंवा रद्द करणे इत्यादी)

७) बोलीदारास आधारकार्ड व वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल

८) २ वाहनांच्या बाबत न्यायिक क्षेत्र मुंबई राहील.

९) सदर वाहने उच्चतम बोलीदाराने विकत घेतल्यावर या वाहनांवरील "महाराष्ट्र शासन" हे लिहिलेले खोडावे. तसेच वाहनांचा भविष्यात गैरउपयोग/अपघात वगैरे झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जबाबदार राहणार नाही, त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी वाहने खरेदीदाराकडे राहील.

१०) यशस्वी झालेल्या उच्चतम बोलीदाराने मंडळातील वाहने खरेदी केल्यानंतर वाहनांची तोडफोड करुन विल्हेवाट लावावयाची असल्यास स्वत: प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून कार्यवाही करावी. मंडळातील जुनी वाहने एकदा खरेदी केल्यानंतर मंडळ कोणत्याही कार्यवाहीसाठी जबाबदार राहणार नाही.

११) बोलीदाराने वाहने घेताना रु.१००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

**कल्पतरू पॉईंट, २/३ व ४था मजला, शीव**
**माटुंगा स्किम रोड नं ८, शीव (पूर्व), मुंबई-४०० ०२२.**

## जाहिरात

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शीव येथील मुख्यालयातील दोन जुन्या वाहनांचे निर्लेखन करावयाचे आहे.सदर वाहने जेथे आहेत ,त्याच स्थितीस लिलावाद्वारे बोलीदारास विकणे आहेत. सदर वाहनाची पाहणी इच्छुक बोलीदारांनी दि ०६/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या दरम्यान कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते ५.०० पर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ४ था मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.८ शीव सर्कल समोर, शीव (पूर्व) मुंबई-४०० ०२२ येथे करण्यात येईल. तसेच वाहनांच्या लिलावासाठी दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० पर्यत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ४ था मजला, शीव माटुंगा स्किम रोड क्र.८ शीव सर्कल समोर, शीव (पूर्व) मुंबई-४०० ० २२ येथे उपस्थित रहावे सदर लिलावाबाबतची सविस्तर माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येत आहे. **https://www.mpcb.gov.in**

वाहनाची पाहणी करण्याची मुदत दिनांक ०६/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या दरम्यान कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत राहील.

**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**